Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004
MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

संदर्भ क्र./शिवाजी वि/संलग्नता/टी-२/ No 828 दि. 08 JAN 2026

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामधील इतर फी (Other Fee), रजिट्रेशन फी (पदव्युत्तर प्रवेश नोंदणी शुल्क), व वार्षिक संलग्नीकरण शुल्काबाबत.

संदर्भ :- संदर्भ क्र./शिवाजी वि./संलग्नता/टी-२/६३५, दि.२२/०९/२०२५ रोजीचे परिपत्रक.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक संलग्नीकरण शुल्क ३१ जुलै, २०२५ पर्यंत भरलेले नाही. अशा महाविद्यालयांनी मुळ संलग्नीकरण + खालील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे विलंब शुल्क भरुन या कार्यालयास शुल्क पावती जमा करावी तसेच महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे नोंदणी शुल्क अद्यापही काही महाविद्यालयांनी भरलेले दिसून येत नाही. अशा महाविद्यायांनी नोंदणी शुल्क भरुन कार्यालयास पावती सादर करावी असे कळविण्यात आले होते.

| अ.क्र. | विलंब शुल्क आकारण्यात येणारा कालावधी | अंतिम तारखेपर्यंत |
|---|---|---|
| १. | ०१ ऑगस्ट, २०२५ ते ३१ ऑगस्ट, २०२५ पर्यत | विहित शुल्क + विहित शुल्काच्या १०% |
| २. | ०१ सप्टेंबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२५ पर्यत | विहित शुल्क + विहित शुल्काच्या २०% |
| ३. | ०१ ऑक्टोंबर, २०२५ ते ३१ ऑक्टोंबर २०२५ पर्यत | विहित शुल्क + विहित शुल्काच्या २५% |

परंतु अद्यापही काही महाविद्यालयांनी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामधील खालील मुद्दयाबाबतचे शुल्क भरलेले दिसून येत नाही. तेंव्हा अशा महाविद्यालयांनी खालील प्रमाणे शुल्क भरण्यात यावे. तसेच ज्या महाविद्यालयांना सदरची शुल्क भरलेले आहेत. अशा महाविद्यालयांनी परिपत्रकानुसार सदरची शुल्क भरणेची आवश्यकता नाही.

१. वार्षिक संलग्नीकरण शुल्क + वरील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे विलंब शुल्क भरून त्याची पावती कव्हरींग लेटरसह विद्यापीठ कार्यालयास (संलग्नता टी-२ विभागास) जमा करावी.
२. महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे नोंदणी शुल्काबाबत विषयानुसार विद्यार्थीची यादी तयार करुन शुल्क भरावे व त्याची पावती व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ कार्यालयास (संलग्नता टी-२ विभागास) जमा करावी.
३. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारी इतर फी (other Fee) विद्यापीठ कार्यालयास (संलग्नता टी-२ विभागास) कव्हरींग लेटरसह पावती जमा करावी.

सबब, उपरोक्त ३ बाबतची शुल्क भरल्यानंतरच जून २०२६ पासूनच्या संलग्नीकरणाच्या प्रस्तावाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आदेशान्वये
PSPandav
(डॉ. पी. एस. पांडव)
उपकुलसचिव
संलग्नता टी - २ विभाग

E:\Nil\Parit Sir\Circular 2025.docx